महाराष्ट्र शासन

## कार्यालय : सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पांढरकवडा

पत्ता: जोशी कॉम्प्लेक्स, शिबला पोईंट, पांढरकवडा ता. केळापुर जि. यवतमाळ
फोन नं.:- ०७२३५- २२७५६९
ई मेल : arcspkd.yml@gmail.com

जा.क्र. सनिपा/नियमन /७३ क अ /1602/२०१७

दिनांक : 15 /11/ २०१७

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ अंतर्गत आदेश

**वाचा - १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ मधील तरतुद.**

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ अंतर्गत कारणे दाखवा नोटीस.

ज्याअर्थी अर्जदार अध्यक्ष/सचिव ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. शिवणी (धोबे ) र.न. २२६ ता. मारेगाव जि यवतमाळ यांनी त्यांचे दिनांक २१/०९/२०१७ रोजीचे अर्जानुसार श्री पांडुरंग नानाजी लोहे व्यवस्थापक समिती सदस्य ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. शिवणी (धोबे) र.न.२२६ ता.मारेगाव जि. यवतमाळ यांचेकडे ह्या संस्थेचे पिक कर्ज थकीत झाल्यामुळे ते ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. शिवणी (धोबे) र.न. २२६ या संस्थेच्या व्यवस्थापक समिती सदस्य पदी राहण्यास अपात्र असल्याबाबत या कार्यालयाचे निदर्शनास आणून दिले आहे व त्या पृष्टार्थ त्यांनी दिनांक २०/०९/२०१७ रोजीच्या त्यांचेवर सदर संस्थेचे पिक कर्ज थकीत असल्याबाबतचा दाखला सादर केला आहे.

ज्याअर्थी या संदर्भात सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पांढरकवडा या कार्यालयात दिनांक १४/११/२०१७ रोजी ठेवलेल्या सुनावणीवेळी अर्जदार ,गैरअर्जदार व संस्थेचे सचिव उपस्थित होते व गैरअर्जदार यांनी असे लेखी म्हणणे सादर केले कि, मी सदर संस्थेच्या व्यवस्थापक समितीचा सदस्य असून बहुतांश सभेला हजर होतो. शासनाच्या कर्जमाफी योजने अंतर्गत परतफेडीच्या तारीख ३१/०७/२०१७ पर्यत भरण्याची मुद्दत होती, त्यामुळे दिनांक ३१/०३/२०१७ ला थकीत होणे हे म्हणणे अयोग्य वाटते. तसेच दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत संस्थेच्या कर्जाची परतफेड करा. याबाबतची कोणतीही नोटीस संस्थेच्या सचिवाकडून प्राप्त झाली नाही. शासनाकडून चालू सभासदांना कर्ज परतफेड करण्याची तारीख ३१/०७/२०१७ होती परंतु काही महत्वाचे व्यवहार थांबल्यामुळे मी दिनांक ३१/०७/२०१७ च्या आत सदर रक्कम भरू शकलो नाही. परंतु दिनांक २९/०९/२०१७ रोजी पावती क्र. १०४२१ नुसार रुपये १४८५०९/-(अक्षरी एक लाख अठ्ठेचाळीस हजार पाचशे नऊ रुपये केवळ) व पावती क्र.१०४२२ नुसार ६६५/-(सहाशे पासष्ट रुपये केवळ) असे एकून १४९१७४/-भरणा केला असून संस्थेचे कर्ज बाकी नसल्याचे प्रमाणपत्र घेतलेले आहे. तरी सदर अपात्रता माझ्या बाबतीत लागू होत नाही असे लेखी म्हणणे सादर केले आहे.

ज्याअर्थी सुनावणीवेळी ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.शिवणी (धोबे) र.न.२२६ या संस्थेने सादर केलेल्या माहितीवरून असे निदर्शनास आले कि, श्री पांडुरंग नानाजी लोहे, व्यवस्थापक समिती सदस्य ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. शिवणी (धोबे) र.न.२२६ यांनी या संस्थेकडून दिनांक २६/०४/२०१६ रोजी १३२६२०/- पिक कर्ज घेतले असून सदर कर्जाची परतफेड त्यांनी नियत दिनांकास म्हणजे ३१/०३/२०१७ रोजी किवा त्यापूर्वी केलेली नसल्यामुळे ते सदर संस्थेचे थकबाकीदार झालेले आहे त्यांचेकडे या संस्थेचे मुद्दल रुपये १३२६२०/- व व्याज रुपये १३६१८/- असे एकून रुपये १४६२३८/- थकीत कर्ज असल्याचे निदर्शनास येते.

सदर संस्थेच्या व्यवस्थापक समितीची निवडणुक दिनांक २०/०३/२०१५ रोजी झाली असून निवडुन आलेल्या समिती सदस्यांचे नावाची अधिसूचना या कार्यालयाचे अधिसुचनाद्वारे प्रसिद्ध करण्यात आली आहे.व त्यानंतर संस्थेची प्रथम सभा तथा पदाधिकारी निवडीची सभा दिनांक ०९/०४/२०१५ रोजी होऊन संस्थेचे व्यवस्थापक समिती सदस्य कार्यरत आहे व समितीमध्ये श्री पांडुरंग नानाजी लोहे हे समिती सदस्य म्हणुन कार्यरत असून त्यांनी त्यांचेकडील उपरोक्त थकीत कर्ज विहित मुदतीत भरणा करण्यास कसुर केला आहे.त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ मधील तरतुदिनुसार सदर संस्थेचे व्यवस्थापक समिती सदस्य पदी राहण्यास त्यांनी अपात्रता धारण केली आहे त्यामुळे गैरअर्जदार श्री पांडुरंग नानाजी लोहे व्यवस्थापक समिती सदस्य ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. शिवणी (धोबे) र.न. २२६ यांचे उपरोक्त लेखी म्हणणे सयुंक्तिक व समाधानकारक वाटत नाही.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ (१) मध्ये समिती सदस्यांच्या अपात्रते बाबत स्पष्ट तरतुद आहे कि, कोणतीही व्यक्ती कोणत्याही संस्थेची कासुरदार असेल तर ती व्यक्ती समितीचा सदस्य म्हणुन नेमणूक होण्यास निवडुन येण्यास किवा सदस्य म्हणुन राहण्यास पात्र असणार नाही. कसुरदार या संज्ञेत प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेच्या बाबतीत पिक कर्जाची नियत दिनांकास परतफेड करण्यास कसुर करणारा सदस्य अशी स्पष्ट तरतुद आहे.

ज्याअर्थी वरील संपूर्ण वस्तूस्थितीवरून असे स्पष्ट होते कि, श्री पांडुरंग नानाजी लोहे हे सदर संस्थेचे थकबाकीदार झाले असल्यामुळे व संस्थेचे कसुरदार असल्यामुळे ते महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ (१) मधील तरतुदीनुसार सदर संस्थेच्या व्यवस्थापक समिती सदस्य पदी राहण्यास पात्र नाही असे स्पष्ट होते. आणि त्यामुळे श्री पांडुरंग नानाजी लोहे हे सदर संस्थेच्या व्यवस्थापक समितीचे सदस्य म्हणुन राहण्यास अपात्रता धारण करीत असल्याची उपरोक्त संपूर्ण वस्तुस्थिती वरून खात्री झाली असल्यामुळे त्यांना सदर संस्थेच्या व्यवस्थापक समितीचे सदस्य पदी राहण्यास अपात्र ठरवून त्यांचे सदर संस्थेचे व्यवस्थापक समितीचे सदस्य पद संपुष्टात आले असल्या बाबतचा आदेश खालीलप्रमाणे पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ (१) मधील तरतुदीनुसार श्री पांडुरंग नानाजी लोहे हे ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. शिवणी (धोबे) र.न.२२६ या संस्थेच्या व्यवस्थापक समिती सदस्य म्हणुन राहण्यास उपरोक्त कारणामुळे अपात्रता धारण करीत असल्यामुळे त्यांना सदर संस्थेचे व्यवस्थापक समिती चे सदस्य पदी राहण्यास अपात्र ठरविण्यात येत आहे व त्यामुळे त्यांचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ (२) मधील तरतुदीनुसार सदर संस्थेचे व्यवस्थापक समितीचे सदस्य असण्याचे बंद झाले आहे. व त्यांचे सदर संस्थेचे व्यवस्थापक समितीचे सदस्य पद संपुष्टात आले आहे .त्यांची या संस्थेतील सदर जागा रिक्त झाल्याचे मानण्यात येईल .

हा आदेश आज दिनांक १५ /११/२०१७ रोजी माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रा नोंदवुन देण्यात येत आहे

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पांढरकवडा
सत्यमेव जयते

(श्री. मुकुंद दे. मेश्राम)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था पांढरकवडा

प्रति,

श्री पांडुरंग नानाजी लोहे, व्यवस्थापक समिती सदस्य विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. शिवणी (धोबे) र.न.२२६ ता.मारेगाव जि.यवतमाळ यांना माहिती करिता अग्रेषित.

प्रतिलिपी,

१. मा.विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांना माहितीकरिता सविनय सादर.

२. मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना माहिती करिता सविनय सादर .

३. अध्यक्ष/सचिव ग्राम  विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.शिवणी (धोबे) र.न.२२६
यांना सूचित करण्यात येते कि आवश्यक कार्यवाही करून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा .

**(श्री. मुकुंद दे. मेश्राम)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पांढरकवडा**